# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO 9001:2008) (ISO/IEC 27001:2005)

४ था मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.

दू.क्र. : २६४७५०७७/२६४७७२०९ फॅक्स : ९१–०२२–२६४७३९८०

ई–मेल : secretary@msbte.com संकेत स्थळ : www.msbte.com


परिपत्रक

जा.क्र. मरातंशिमं/का-४०/बी-२३/२०१४/०२४
दिनांक – १५.०१.२०१४

प्रति,
प्राचार्य,
म.रा.तंत्रशिक्षण मंडळाशी
संलग्नीत असलेल्या सर्व संस्था.

विषय :- **शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादीबाबत...**

संदर्भ :- मंडळाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-४०/बी-२३/२०१४/०१३, दि. ०८.०१.२०१४.

मंडळाच्या संदर्भाधिन परिपत्रकान्वये सहसंचालकांनी प्रमाणित केलेल्या शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादया मंडळाच्या संबंधित विभागीय कार्यालयास तात्काळ सादर करण्याबाबत सूचित करण्यात आलेले होते. तसेच ज्या संस्थांच्या गुणवत्ता यादया प्राप्त होणार नाहीत त्या संस्थांच्या प्रथम सत्राच्या विद्यार्थ्यांचे हिवाळी परीक्षा २०१३ चे निकाल रोखून ठेवण्यात येतील अशाही सूचना सर्व संस्थांना देण्यात आलेल्या होत्या.

तथापि ज्या संस्थांच्या गुणवत्ता यादया प्राप्त झालेल्या नाहीत त्या संस्थांच्या प्रथम सत्राच्या हिवाळी परीक्षा २०१३ चे निकाल **विद्यार्थ्यांच्या हितास्तव** मंडळाकडून जाहिर करण्यात येत आहेत.

ज्या संस्थांच्या गुणवत्ता यादया प्राप्त झालेल्या नाहीत त्या संस्थांच्या गुणवत्ता यादया मंडळाच्या विभागीय कार्यालयास प्राप्त होईपर्यंत त्या संस्थेतील प्रथम सत्राच्या विद्यार्थ्यांना गुणपत्रिका प्रदान करण्यात येणार नाहीत याची संस्थांनी नोंद घ्यावी.

( डॉ. विनोद म. मोहितकर )
सचिव,
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत -
उपसचिव, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, वि.का. पुणे/औरंगाबाद/नागपूर तथा प्रभारी अधिकारी, मुंबई उपविभाग यांना कळविण्यात येते की, ज्या संस्थांच्या गुणवत्ता यादया प्राप्त झालेल्या नाहीत. त्या संस्थांच्या गुणवत्ता यादया प्राप्त होईपर्यंत त्या संस्थांच्या प्रथम सत्राच्या विद्यार्थ्यांना गुणपत्रिका प्रदान करण्यात येऊ नये.

F:/Harshada/circular